RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक ३] शुक्रवार, जानेवारी २३, २०२६/माघ ३, शके १९४७ [पृष्ठे ८ किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ४**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन,मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२

**अधिसूचना**

**संदर्भ** :- १.'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५', दि. ०५ मे, २०२५.

२. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/रापनों-२०२४/प्र.क्र.२४/का.११, दि. २५ नोव्हेंबर, २०२५.

३. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/रापनों-२०२४/प्र.क्र.२४/का.११, दि. २१ जानेवारी, २०२६.

क्रमांक रानिआ/रापनों-२०२५/प्र.क्र.२४/का.११, दिनांक २३ जानेवारी २०२६.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधीक्षण, संचलन व नियंत्रणाची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे ; आणि

ज्याअर्थी, राजकीय पक्षांच्या नोंदणीसंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांची अंमलबजावणी करताना होणारा संभ्रम दूर करण्याकरिता, आदेशांच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' दिनांक ५ मे २०२५ रोजीचा आदेश **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आला आहे.

त्याअर्थी, उक्त आदेशामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करणे आवश्यक असल्याची राज्य निवडणूक आयोगाची खात्री झाल्याने आणि उक्त आदेशातील परिच्छेद २७ मधील राज्य निवडणूक आयोगास प्राप्त अधिकारान्वये खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ दिनांक ५ मे २०२५ च्या आदेशातील परिच्छेद १३ व परिच्छेद १४ मधील आधीच्या तरतुदी रद्द करून सुधारित परिच्छेद १३ व परिच्छेद १४ सामाविष्ट करण्यात येत आहे :

### उक्त आदेशातील परिच्छेद १३ व परिच्छेद १४ मधील आधीच्या तरतुदी

**१३. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांबाबत :**

(१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे उमेदवार व अपक्ष उमेदवारास नामनिर्देशनपत्र दाखल करताना परिच्छेद २३(१) (ङ) नुसार मुक्त चिन्हे म्हणून विनिर्दिष्टित केलेल्या चिन्हांपैकी जास्तीत जास्त कोणत्याही तीन चिन्हांची प्राधान्यक्रमानुसार मागणी करता येईल.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी हा राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांना चिन्ह वाटप केल्यानंतर अपक्ष उमेदवारांना चिन्हाचे वाटप करेल.

(३) जर अनेक उमेदवारांनी एकाच मुक्त चिन्हाची निवड केली आणि जर या अनेक उमेदवारांपैकी एक उमेदवार नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा असेल आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी ते मुक्त चिन्ह नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास देईल, इतर कोणासही देणार नाही.

(४) जर या अनेक उमेदवारांपैकी दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवार नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे असल्यास आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी फक्त नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांच्या नावाच्या चिठ्या टाकून (सोडतीद्वारे) निर्णय घेईल. ज्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी येईल, त्या उमेदवारास त्याने मागणी केलेल्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल आणि इतर कोणासही नाही.

(५) जर अशा निवडणुकीत अनेक अपक्ष उमेदवारांनी प्राधान्यक्रमानुसार एकाच मुक्त चिन्हाची निवड केली असल्यास संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यासाठी सोडत पद्धतीने निर्णय घेईल. ज्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी निघेल, त्या उमेदवारास त्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल. या पद्धतीचा अवलंब करून व प्राधान्यक्रम विचारात घेऊन सर्व अपक्ष उमेदवारांना चिन्हांचे वाटप करण्यात येईल.

(६) प्राधान्यक्रम किंवा सोडतीनंतरही नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष अथवा अपक्ष उमदेवारास चिन्ह वाटप होऊ न शकल्यास, मुक्त चिन्हांच्या सूचीतील शिल्लक मुक्त चिन्हांपैकी जे चिन्ह अनुक्रमानुसार उपलब्ध असेल त्या चिन्हाचे संबंधित उमेदवारास वाटप केले जाईल.

**१४. यथास्थिती महापौर व नगरपरिषद, नगरपंचायतीच्या अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीबाबत:**

(१) यथास्थिती महापौर किंवा नगरपरिषद/नगरपंचायतींच्या अध्यक्षपदासाठी थेट निवडणूक होत असल्यास, सुरुवातीला महापौर/अध्यक्षपदाच्या उमेदवारांना प्राधान्याने चिन्ह वाटप केले जाईल. त्यांना वाटप केलेली चिन्हे मुक्त चिन्हांपैकी असल्यास त्या मुक्त चिन्हांचे वाटप सदस्यपदाच्या इतर कोणत्याही उमेदवारांना केले जाणार नाही :

परंतु, एखादा उमेदवार महापौर/अध्यक्षपदासोबत सदस्यपदाची निवडणूक लढवत असल्यास, त्या उमेदवारास महापौर/अध्यक्षपदाकरिता वाटप करण्यात आलेले चिन्ह त्याने मागणी केल्यास, तो निवडणूक लढवत असलेल्या प्रभागांतील सदस्यपदांकरितादेखील देण्यात येईल.

### सुधारित परिच्छेद १३ व परिच्छेद १४ मधील तरतुदी

**१३. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांबाबत:**

(१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे उमेदवार व अपक्ष उमेदवारास नामनिर्देशनपत्र दाखल करताना परिच्छेद २३(१)(ङ) नुसार मुक्त चिन्हे म्हणून विनिर्दिष्टित केलेल्या चिन्हांपैकी जास्तीत जास्त कोणत्याही तीन चिन्हांची प्राधान्यक्रमानुसार मागणी करता येईल.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी हा राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांना चिन्ह वाटप केल्यानंतर अपक्ष उमेदवारांना चिन्हाचे वाटप करेल.

(३) जर अनेक उमेदवारांनी एकाच मुक्त चिन्हाची निवड केली आणि जर या अनेक उमेदवारांपैकी एक उमेदवार नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा असेल आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी ते मुक्त चिन्ह नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास देईल, इतर कोणासही देणार नाही.

(क) जिल्हापरिषद व पंचायत समितीसाठीः एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास एका जिल्हापरिषद विभागासाठी मुक्त चिन्हाचे परिच्छेद १३(३) प्रमाणे वाटप केल्यास, त्याच नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांस त्यांच्या नामनिर्देशनपत्रातील मागणीनुसार त्या जिल्हापरिषद विभागाअंतर्गत येणाऱ्या दोन्ही पंचायत समिती निर्वाचक गणासाठीदेखील जिल्हापरिषद विभागासाठी वाटप करण्यात आलेले मुक्त चिन्ह देण्यात येईल, तसेच असे मुक्त चिन्ह संबंधित जिल्हापरिषद विभागाअंतर्गतच्या दोन्ही निर्वाचक गणातील अन्य कुठल्याही उमेदवारास वाटप केले जाणार नाही.

(४) जर या अनेक उमेदवारांपैकी दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवार नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे असल्यास आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी फक्त नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांच्या नावाच्या चिठ्या टाकून (सोडतीद्वारे) निर्णय घेईल. ज्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी येईल, त्या उमेदवारास त्याने मागणी केलेल्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल आणि इतर कोणासही नाही.

(क) जिल्हापरिषद व पंचायत समितीसाठीः एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास एका जिल्हापरिषद विभागासाठी मुक्त चिन्हाचे परिच्छेद १३(४) प्रमाणे वाटप केल्यास, त्याच नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांस त्यांच्या नामनिर्देशनपत्रातील मागणीनुसार त्या जिल्हापरिषद विभागाअंतर्गत येणाऱ्या दोन्ही पंचायत समिती निर्वाचक गणासाठीदेखील जिल्हापरिषद विभागासाठी वाटप करण्यात आलेले मुक्त चिन्ह देण्यात येईल, तसेच असे मुक्त चिन्ह संबंधित जिल्हापरिषद विभागाअंतर्गतच्या दोन्ही निर्वाचक गणातील अन्य कुठल्याही उमेदवारास वाटप केले जाणार नाही.

(५) जर अशा निवडणुकीत अनेक अपक्ष उमेदवारांनी प्राधान्यक्रमानुसार एकाच मुक्त चिन्हाची निवड केली असल्यास संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यासाठी सोडत पद्धतीने निर्णय घेईल. ज्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी निघेल, त्या उमेदवारास त्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल. या पद्धतीचा अवलंब करून व प्राधान्यक्रम विचारात घेऊन सर्व अपक्ष उमेदवारांना चिन्हांचे वाटप करण्यात येईल.

(क) जिल्हापरिषद व पंचायत समितीसाठीः एखाद्या अपक्ष उमेदवारास परिच्छेद १३(५) प्रमाणे एका जिल्हापरिषद विभागासाठी मुक्त चिन्हाचे वाटप केल्यास, व सदर अपक्ष उमेदवार त्या जिल्हापरिषद विभागांतर्गत येणाऱ्या पंचायत समिती निर्वाचक गणासाठीदेखील निवडणूक लढवत असल्यास त्या अपक्ष उमेदवारास त्याच्या नामनिर्देशनपत्रातील मागणीनुसार पंचायत समिती निर्वाचक गणासाठीदेखील जिल्हापरिषद विभागासाठी वाटप करण्यात आलेले मुक्त चिन्ह देण्यात येईल, तसेच असे मुक्त चिन्ह संबंधित जिल्हापरिषद विभागाअंतर्गतच्या दोन्ही निर्वाचक गणातील अन्य कुठल्याही उमेदवारास वाटप केले जाणार नाही.

(६) प्राधान्यक्रम किंवा सोडतीनंतरही नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष अथवा अपक्ष उमदेवारास चिन्ह वाटप होऊ न शकल्यास, मुक्त चिन्हांच्या सूचीतील शिल्लक मुक्त चिन्हांपैकी जे चिन्ह अनुक्रमानुसार उपलब्ध असेल त्या चिन्हाचे संबंधित उमेदवारास वाटप केले जाईल.

**१४. यथास्थिती महापौर व नगरपरिषद, नगरपंचायतीच्या अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीबाबतः**

(१) यथास्थिती महापौर किंवा नगरपरिषद/नगरपंचायतीच्या अध्यक्षपदासाठी थेट निवडणूक होत असल्यास, सुरुवातीला महापौर/अध्यक्षपदाच्या उमेदवारांना प्राधान्याने चिन्ह वाटप केले जाईल. एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या महापौर/अध्यक्षपदाच्या उमेदवारास वाटप केलेले चिन्ह मुक्त चिन्हांपैकी असल्यास आणि तो उमेदवार त्याच नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाकडून सदस्यपदाचीही निवडणूक लढवित असल्यास त्या उमेदवाराने त्याच्या नामनिर्देशनपत्रात त्याच मुक्त चिन्हाची मागणी केली असल्यास, त्याला त्या मुक्त चिन्हाचे थेट वाटप करावे.

(२) एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाकडून महापौर/अध्यक्षपदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास वाटप करण्यात आलेले चिन्ह हे मुक्त चिन्हांपैकी असल्यास त्या मुक्त चिन्हाचे नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या सदस्यपदांच्या उमेदवारांना त्यांच्या नामनिर्देशनपत्रातील मागणीनुसार परिच्छेद १३ आणि १५(२)(क) मधील तरतुदीनुसार वाटप करण्यात येईल.

( ३ ) एखादा अपक्ष उमेदवार महापौर/अध्यक्षपदाच्या निवडणुकीसोबत सदस्यपदाचीही निवडणूक लढवित असल्यास त्या उमेदवारास महापौर/अध्यक्षपदाकरिता वाटप करण्यात आलेल्या मुक्त चिन्हाचे त्याच्या नामनिर्देशनपत्रातील मागणीनुसार सदस्यपदासाठीदेखील थेट वाटप करण्यात येईल; परंतु त्या उमेदवारास वाटप केलेल्या मुक्त चिन्हाचे सदस्यपदाच्या इतर कोणत्याही नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष किंवा अपक्ष उमेदवारास वाटप केले जाणार नाही.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

**सुरेश काकाणी,**
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र.

**STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA**

New Administrative Building, First Floor, Hutatma Rajguru Chowk,
Madame Cama Road, Mumbai 400 032.

*NOTIFICATION*

*Reference*.— 1. 'Maharashtra State Political Parties Registration, Regulation and Election Symbols(Reservation and Allotment) Order, 2025', dated 5th May 2025.

2. State Election Commission Order No. SEC/RPP/2024/CR-24/D-11, dated 25th November, 2025.

3. State Election Commission Order No. SEC/RPP/2024/CR-24/D-11, Dated 21st January 2026.

No. SEC/RPP/2026/CR-24/D-11, dated 23rd January 2026.—Whereas, as per Articles 243K and 243ZA of the Constitution of India, the State Election Commission is empowered with all rights in respect of supervision, direction and control of all elections to all local self-government bodies in the State ; and

Whereas, in order to consolidate all previous orders and remove any probable confusion while implementing the orders issued from time to time regarding the registration of political parties, and to bring uniformity in the implementation of the orders, the 'Maharashtra State Political Parties Registration, Regulation and Election Symbols (Reservation and Allotment) Order, 2025', dated 05th May, 2025 has been published in the *Gazette* ;

And whereas the State Election Commission has come to the conclusion that the said order needs to be amended as follows to bring further clarity and in accordance with the powers vested in the State Election Commission under paragraph 27 of the said order, the following order is hereby issued.

**Order**

The previous provisions of paragraphs 13 and 14 of the Maharashtra State Political Parties Registration, Regulation and Election Symbols (Reservation and Allotment) Order, 2025, dated 5th May 2025 are hereby repealed and amended paragraphs 13 and 14 are hereby inserted :

**The previous provisions of paragraphs 13 and 14 of the said order :**

**13. Regarding registered unrecognized political parties and independent candidates:**

**(1)** In the elections for Local Self-Government bodies, the candidate of a registered unrecognized political party and the independent candidate, while filing nomination form, may demand at most any three symbol amongst the symbols specified as free symbols under Paragraph 23(1)(e) in order of priority.

**(2)** The Returning Officer shall allot symbols to independent candidates after allotting symbols to candidates of unrecognized political parties registered with the State Election Commission.

**(3)** If several candidates opt for the same free symbol and if one of these candidates belongs to a registered unrecognized political party and the rest of them are independent candidates, then, the Returning Officer shall award that free symbol to the candidate of a registered unrecognized political party and will not allot it to anyone else.

**(4)** If two or more of these candidates belong to a registered unrecognized political party and rest of them are independent candidates, the Returning Officer shall take decision by drawing chits (by draw of lots) only from among the names of the candidates of the registered unrecognized political parties. The candidate of a registered unrecognized political party, in whose favour the chit is drawn, shall be allotted the free symbol as sought by him and that symbol shall not be allotted to anyone else. The remaining candidates of unrecognized political parties shall be allotted other which symbols which have not been allotted earlier to any other candidate.

**(5)** If in such elections several independent candidates choose the same free symbol in order of preference, then, for the allotment of symbols to independent candidates, the concerned Returning Officer shall take decision by draw of lots, and a free symbol will be allotted to the candidate, in whose favour the chit has been drawn.

**(6)** After allotment of symbols according to the order of preference or drawing of lots, any candidate of a registered unrecognized political party or independent candidate is yet to be allotted a symbol, then a symbol available among the remaining free symbols will be allotted to the concerned candidate in the sequence of the free symbol chart.

**14. Regarding direct elections of Mayor and President of Municipal Council, Nagar Panchayat :**

(1) In case of direct election for the post of Mayor, President of Municipal Council and Nagar Panchayat, as the case may be, symbols shall be allotted first to the candidates for the post of Mayor/ President. If symbols allotted to them are amongst the free symbols, then those free symbols shall not be allotted to any other candidate contesting for the post of member :

Provided that, if a candidate is contesting for the post of member alongwith the post of Mayor/ President, the symbol allotted to that candidate for the post of Mayor/President shall, if he so demands, also be allotted for contesting the post of member, from the ward from which he contests.

**Provisions in amended paragraphs 13 and 14 :**

**13. Regarding registered unrecognized political parties and independent candidates:**

**(1)** In the elections for Local Self-Government bodies, the candidate of a registered unrecognized political party and the independent candidate, while filing nomination form, may demand at most any three symbol amongst the symbols specified as free symbols under Paragraph 23(1)(e) in order of priority.

**(2)** The Returning Officer shall allot symbols to independent candidates after allotting symbols to candidates of unrecognized political parties registered with the State Election Commission.

**(3)** If several candidates opt for the same free symbol and if one of these candidates belongs to a registered unrecognized political party and the rest of them are independent candidates, then, the Returning Officer shall award that free symbol to the candidate of a registered unrecognized political party and will not allot it to anyone else.

**(a) For Zilla Parishad and Panchayat Samiti:** If a free symbol is allotted to a candidate of a registered unrecognized political party for one Zilla Parishad division in accordance with paragraph 13(3), then the same free symbol shall be allotted to the candidates of the same registered unrecognized political party for the two Panchayat Samiti electoral colleges falling within that Zilla Parishad division, as per the preference indicated in the nomination paper by the candidates. Such free symbol shall not be allotted to any other candidate in both the Panchayat Samiti electoral college under that Zilla Parishad division.

**(4)** If two or more of these candidates belong to a registered unrecognized political party and rest of them are independent candidates, the Returning Officer shall take decision by drawing chits (by draw of lots) only from among the names of the candidates of the registered unrecognized political parties. The candidate of a registered unrecognized political party, in whose favour the chit is drawn, shall be allotted the free symbol as sought by him and that symbol shall not be allotted to anyone else. The remaining candidates of unrecognized political parties shall be allotted other which symbols which have not been allotted earlier to any other candidate.

**(a) For Zilla Parishad and Panchayat Samiti:** If a free symbol is allotted to a candidate of a registered unrecognized political party for one Zilla Parishad division in accordance with paragraph 13(4), then the same free symbol shall be allotted to the candidates of the same registered unrecognized political party for the two Panchayat Samiti electoral colleges falling within that Zilla Parishad division, as per the preference indicated in the nomination paper by the candidates. Such free symbol shall not be allotted to any other candidate in both the Panchayat Samiti electoral colleges under that Zilla Parishad division.

**(5)** If in such elections several independent candidates choose the same free symbol in order of preference, then, for the allotment of symbols to independent candidates, the concerned Returning Officer shall take decision by draw of lots, and a free symbol will be allotted to the candidate, in whose favour the chit has been drawn.

**(a) For Zilla Parishad and Panchayat Samiti :** If an independent candidate is allotted a free symbol for a Zilla Parishad division as per paragraph 13(5), and the said independent candidate is also contesting the election for a Panchayat Samiti electoral college falling under that Zilla Parishad division, the free symbol allotted for the Zilla Parishad division shall be given to that independent candidate for the Panchayat Samiti electoral division falling under that Zilla Parishad division as per the preference indicated in the nomination paper, and such free symbol shall not be allotted to any other candidate in both the Panchayat Samiti electoral colleges falling under that Zilla Parishad division.

**(6)** After allotment of symbols according to the order of preference or drawing of lots, any candidate of a registered unrecognized political party or independent candidate is yet to be allotted a symbol, then a symbol available among the remaining free symbols will be allotted to the concerned candidate in the sequence of the free symbol chart.

**14. Regarding direct elections of Mayor and President of Municipal Council, Nagar Panchayat :**

(1) In case of direct election for the post of Mayor or President of the Municipal Council/Nagar Panchayat, as the case may be, symbols shall be allotted first to the candidates for the post of Mayor/President. If the symbol allotted to the candidate of a registered unrecognized political party for the post of Mayor/President is one of the free symbols and if that candidate is also contesting the election for the post of member from the same registered unrecognized political party, and if that candidate has demanded the same free symbol in his nomination paper, then that free symbol shall be allotted to the said candidate.

(2) If the symbol allotted to a candidate contesting the election to the post of Mayor/President on behalf of a registered unrecognized political party is a free symbol, the same free symbol shall be allotted to the candidates of that registered unrecognized political party contesting the election to the post of member in accordance with the preferences mentioned in the nomination papers and as per the provisions of paragraph 13 and paragraph 15(2)(a).

(3) If an independent candidate is contesting the election for the post of Member along with the election for the post of Mayor/President, the free symbol allotted to that candidate for the post of Mayor/President shall be directly allotted for the post of Member as per the demand in his nomination paper; but the free symbol allotted to that candidate shall not be allotted to any other candidate of a registered unrecognized political party or independent candidate who is contesting the election for the post of Member.

With the approval of the Hon'ble State Election Commissioner,

SURESH KAKANI,
Secretary,
State Election Commission, Maharashtra.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.